# <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ४४६/२०२४ मधील नि.क्र.३० वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज, वादीने मयत प्रतिवादी ७ सुलोचना शंकर पवार यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करुन मयताचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी ७ ह्या दिनांक २८.०२.२०२५ रोजी मयत झाले आहेत. वादी यांना प्रतिवादी ७ चे मृत्युचा दाखला व त्यांचे वारसांबाबतची माहिती लवकर मिळून न आल्याने प्रस्तुतचा अर्ज उशीराने सादर करण्यात आलेला आहे. दाव्यामध्ये कोणतीही तांत्रीक त्रुटी राहू नये याकरीता मयत प्रतिवादी ७ विरुध्द अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मयताचे वारस अभीलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब वादीची विनंती आहे की, मयत प्रतिवादी ७ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात यावा.

२. प्रस्तुतचे अर्जास प्रतिवादीतर्फे हरकत नोंदविण्यात आली. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार अर्जात दिलेले कारण कायदेशीर नसल्याने अर्ज नामंजूर करावा.

३. अर्जदारांचे कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी ७ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

४. वादी व प्रतीवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जामधील मजकुरावरुन प्रतिवादी ७ सुलोचना शंकर पवार या दिनांक २८.०२.२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. वादीने दावा वाटप होऊन कब्जा मिळण्यासाठी, अतिक्रमण काढून मिळणेकरिता व निरंतर ताकीदिसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादीच्या वारसांना दावा पुढे चालविण्याचा हक्क आहे. अभिलेखावरील वस्तुस्थिती लक्षात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य असून वारस रेकॉर्डवर घेऊन दुरुस्ती होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे मुळ

दाव्यात बदल होणार नाही अगर स्वरुपही बदलणार नाही. वारसांना त्यांच्या हक्काबाबत दावा पुढे चालविण्याचा अधिकार आहे. सबब केसमधील वाद मुद्दा गुणदोषावर निकाली होणेसाठी मयत प्रतिवादी ७ सुलोचना शंकर पवार यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब मुद्दा क्रमांक १ होकारार्थी देऊन मुद्दा क्रमांक २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी ७ सुलोचना शंकर पवार यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.07.09 17:39:21 +0530

**( व्ही. बी. घाडगे )**
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.

दिनांकः- ०८.०७.२०२५